# सहकारमध्ये शिवकृपाचे कामकाज आदर्शवत- महापौर सौ. संगिता खोत

सातारा (प्रतिनिधी )

शिवकृपा सहकारी पतपेढी लि. मुंबई च्या मिरज शाखेचा उदघाटन सोहळा सांगली- मिरज -कुमगांव शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. संगिता विठलराव खोत यांचे शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सन्माननीय श्री.डॉ. सुर्यकांत व्हावळ अध्यक्ष नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असो. मिरज तालुका मा.नगरसेवक श्री.करण जामदार,माजी महापौर श्री विजय धुळगुळ, श्री.दिपक शिंदे, कार्यक्रमांचे समारंभ अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. कृष्णा शेलार उपस्थित होते.

संस्थेची ३७ वर्षाची विश्वासपुर्वक वाटचालीत ३७०० कोटीचा संमिश्र व्यवसाय केला असून संचालक मंडळाचे व कर्मचारी यांचे परिश्रम योग्य नियोजन, कठोर मेहनत,आधुनिकीकरण यामुळे हे शक्य झाले आहे.संस्थेने सर्वसामान्य लोकांची पत वाढविण्याचे काम केले आहे. असे गौरवोदगार मा. सौ.संगिता विठलराव खोत यांनी काढले.व संस्थेचा निखळ व पारदर्शी कारभार असल्याने संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो,यासाठी मनःपुर्वक शुभेच्छा.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संचालक श्री. अशोक तुपे यांनी केले. वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेची ३७वर्षाची गौरवशाली वाटचाल, ७ विभागीय कार्यालये, १प्रशासकीय कार्यालय व १०० शाखांचा विस्तार झाला आहे. तसेच संस्थेचे गतीमान प्रशासन,ग्राहकांना तत्पर व घरपोच सेवा.नवतंत्रज्ञानाचे वाढते महत्व लक्षांत घेवून आपली संस्था गेली २४ वर्षे ग्राहकांना संगणकाद्वारे सेवा देत आहे. त्यामुळे संस्थेच्या खातेदारांना तत्पर अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध होत आहे. परिणामी ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास वृध्दिंगत झालाआहे.संस्थेने ग्राहक सेवेकरीता कोअर बँकिंग प्रणाली व मिनी ए.टी.एम. सेवेचा अवलंब केलेला आहे. तसेच मोबाईल अॅप द्वारे ठेवीचे संकलन केले जाते. संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्व लक्षांत घेवून प्रशासकिय कार्यालय संस्थेच्या विभागीय कार्यालयाबरोबरच प्रशिक्षण केंद्राशी व्हिडीओ कॉन्फरसिंग या आधुनिक प्रणालीद्वारे एकमेकाशी जोडलेले आहे. ही सुविधा असणारी शिवकृपा ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील पहिली सहकारी पतसंस्था ठरली आहे. असे सांगून पतपेढीने आपल्या पारदर्शक कामकाजाने महाराष्ट्रभर लौकिक मिळविला शासनाचा सहकार भुषण हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. राज्य फेडरेशनचा दिपस्तंभ आणि राज्यातील सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

संस्थेने संमिश्र व्यवसायाचे रू.४०००कोटीचे उदिष्ट ठेवले असून नजीकच्या काळात उदिष्ट पुर्ण होईल. असा विश्वास व्यक्त केला. मिरज वासीयांनीही शाखेस सहकार्य करण्याबाबत त्यांनी आवाहन केले आहे. संस्थेच्या शिवकृपा भवन या नूतन प्रशासकीय कार्यालयाच्या ७ मजली इमारतीचे बांधकाम सुरू असून लवकरच पुर्णत्वास येईल. असे नमुद केले.

प्रमुख पाहुणे श्री. डॉ. सुर्यकांत व्हावळ अध्यक्ष नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असो. मिरज तालुका अध्यक्ष मा.श्री. करण जामदार नगरसेवक सांगली मिरज कुपवाड शहर यांनी मनोगत व्यक्त करून संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



शिवकृपाच्या मिरज शाखेचे उदघाटन करताना सांगली –मिरज–कुपवाड महानगरपालिकेच्या महापौर सौ. संगिता खोत,संस्थेचे सस्थापक अध्यक्ष कृष्णा शेलार व संस्थेचे उपाध्यक्ष वसंत चव्हाण ,संचालक मंडळ व मान्यवर

## सहकारमध्ये शिवकृपाचे ... आदर्शवत- महापौर सौ. ...

पान ३ वरून

कार्यक्रमांस संस्थेचे उपाध्यक्ष वसंत चव्हाण ... बोराडे,जयवंत खामकर,अॅड अशोक शिंदे, दि... देशमुख, संचालिका सौ.अपर्णा शिंदे,कर्मचा... येवले,मुख्य कार्यकारी अधिकारी चंदकांत शेळके ... संदिप जाधव तसेच परिसरातील नागरिक मोठ्... होते.

उदघोटन सोहळयाप्रसंगी संस्थेचे संचालक ... उपस्थितांचे आभार मानले. व शिवकृपा परिवाराच्... हार्दिक शुभेच्छा दिल्या. व विभागीय अधिकारी श्... यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. विभाग... अधिकारी श्री.हनमंत अनभुले,श्री.दुर्योधन माने ... वसूली अधिकारी शंकर शिंदे,मिरज शाखेचे ... .दिनकर हिरवे व सातारा विभागातील सर्व शाख...